ओगावा सोसायटी, कामठी, नागपूर येथील ड्रॅगन पॅलेस टेम्पल व परिसराच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्वसेअ -२०१९/प्र.क्र.२००(भाग-३)/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ३१ ऑगस्ट, २०१९.

वाचा :-

१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन पत्र, क्र. बैठक-२०१९/प्र.क्र.७३/ बांधकामे, दि.८/३/२०१९ च्या पत्रासोबतचे इतिवृत्त.
२) मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि.०४.०७.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
३) दि.२९.०७.२०१९ च्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
४) दि.२०.०८.२०१९ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

ओगावा सोसायटी, कामठी, नागपूर येथील ड्रॅगन पॅलेस टेम्पल व परिसर विकास आराखडा हा नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केला आहे. सदर आराखड्यास जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिल्यानंतर प्रस्ताव पर्यटन विभागास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला. सदर प्रकरणी गुरूवार,दि. ४ जुलै,२०१९ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानुषंगाने, ओगावा सोसायटी, कामठी, नागपूर येथील ड्रॅगन पॅलेस टेम्पल व परिसर येथील विकास कामांच्या एकूण रु.२१४.०० कोटी या प्राप्त प्रस्तावातील पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) साठी रु.३०,४२,८२,९३७/- (अक्षरी रुपये तीस कोटी बेचाळीस लक्ष ब्याऐंशी हजार नऊशे सदतीस फक्त) व निवास व्यवस्था (अकोमोडेशन) साठी रु.४४,७४,१४,२००/- (अक्षरी रुपये चव्वेचाळीस कोटी चौऱ्याहत्तर लक्ष चौदा हजार दोनशे फक्त) अशा एकूण रु. ७५,१६,९७,१३७/- (अक्षरी रूपये पंच्याहत्तर कोटी सोळा लक्ष सत्यान्नव हजार एकशे सदतीस फक्त) या दोन कामांना टप्पा-१ अंतर्गत उच्चाधिकार समितीने मान्यता दिली असून सदर प्रस्ताव दि.२०.०८.२०१९ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन टप्पा-१ अंतर्गत पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) व निवास व्यवस्था (अकोमोडेशन) या दोन कामांच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

ओगावा सोसायटी नागपूर यांच्या ड्रॅगन पॅलेस टेम्पल, कामठी जि. नागपूर येथील विकास कामांच्या रु.२१४.०० कोटी रकमेच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात येत असून त्यापैकी उच्चाधिकार समितीच्या निर्देशास अनुसरुन सदर कामाचा टप्पा-१ अंतर्गत पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) साठी रु.३०,४२,८२,९३७/- (अक्षरी रुपये तीस कोटी बेचाळीस लक्ष ब्याऐंशी हजार नऊशे सदतीस फक्त) व निवास व्यवस्था (अकोमोडेशन) रु.४४,७४,१४,२००/- (अक्षरी रुपये चव्वेचाळीस कोटी चौऱ्याहत्तर लक्ष चौदा हजार दोनशे फक्त) अशा एकूण रु. ७५,१६,९७,१३७/- (अक्षरी रूपये पंच्याहत्तर कोटी सोळा लक्ष सत्यान्नव हजार एकशे सदतीस फक्त) इतक्या रकमेच्या

कामांना खालील अटींच्या अधिन राहुन या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ ता.क्र.१, दि.१० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

५) प्रस्तावित बांधकामाची जागा सदर संस्थेच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

६) नियोजित जागा संस्थेच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून सदर कामाच्या निविदा सुचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

७) सदरील कामाकरीताचा निधी नविन लेखाशीर्ष उघडून पूरवणी मागणीव्दारे विशेष घटक योजनेतून अतिरिक्त नियतव्यय मंजूर करुन भागविण्यात येईल.

८) सदर कामाचे अंदाजपत्रक नागपूर महानगर प्रदेश विकास प्राकिरण, नागपूर यांनी तयार केले असून सदर अंदाजपत्रकातील काही बाबींचे दर हे बाजार भावाप्रमाणे आकारण्यात आले आहे. त्यास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नागपूर यांनी तपासून साक्षांकन करणे आवश्यक आहे.

९) सदर प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेले नकाशे/आराखडे खाजगी वास्तुशास्त्रज्ञ यांनी तयार केले असून त्यास मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे साक्षांकन आवश्यक आहे.

१०) या कामाकरीता नोडल एजन्सी म्हणून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर हे काम पाहतील.

११) ड्रॅगन पॅलेस टेम्पल, कामठी जि. नागपूर येथील काम पूर्ण झाल्यानंतर सदरील वास्तूची देखभाल व दुरूस्तीच्या आवर्ती खर्चाची जबाबदारी संपूर्णपणे ओगावा सोसायटी, नागपूर यांची राहील.

१२) सदर प्रकल्पाची मालकी संयुक्तपणे ओगावा सोसायटी व महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांची राहील.

२. सदर योजनेअंतर्गत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. प्रस्तुतचा शासन निर्णय, उच्चाधिकार समिती व मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०८३११६२३१५४७२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: CN = Anil Kondaji Ahire, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Social Justice and Special Assistance Department
Date: 2019.08.31 16:33:41 +05'30'

(अनिल कों. आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
४) सर्व सन्माननीय संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
५) मा.मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
७) प्रधान सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-४०००३२.
८) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राकिरण, नागपूर.
१०) जिल्हाधिकारी, नागपूर.
११) मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव
१२) मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव.
१३) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, नागपूर.
१४) सहायक आयुक्त, समाजकल्याण, नागपूर.
१५) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१६)) अध्यक्ष, ओगावा सोसायटी, कामठी, नागपूर.
१७) निवडनस्ती, कार्यासन-बांधकामे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मुंबई.